# पारंपरिक मल्लखांब खेळाला पुन्हा झळाळी

## सांताक्रूझमधील साने गुरुजी आर्य विद्यामंदिरतर्फे मल्लखांब स्पर्धेचे आयोजन

वार्ताहर
पवई

पारंपरिक पण मातीतील खेळ म्हणून गणल्या जाणाऱ्या मल्लखांब खेळाला पुन्हा झळाळी देण्यासाठी नानावटी रुग्णालयाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत असून प्रचारासाठी मल्लखांब स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी या स्पर्धेला मोठा प्रतिसाद लाभला असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

सांताक्रूझमधील साने गुरुजी आर्य विद्यामंदिरने मल्लखांब स्पर्धेचे आयोजन केले होते. यात नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा देखील सहभाग होता. तरुणांचा या खेळातील रस वाढण्यासाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत मुंबईतील विविध शाळांतील २३ संघांमधील २०० जणांनी सहभाग घेतला. मल्लखांब हा पारंपरिक भारतीय खेळ असून त्यासाठी जिम्नॅस्टीकने अक्रोबेटिक फीट्स कराव्या लागतात किंवा उभ्या खांबाच्या किंवा दोरीच्या मदतीने पोझ द्यायच्या असतात.

**नानावटी हॉस्पिटलचा सहयोग**

'क्रिकेट व फुटबॉल अशा खेळांची चाहती असलेल्या सध्याच्या पिढीला मल्लखांब स्पर्धा या पारंपरिक खेळाविषयी प्रेम वाटावे, हा उद्देश या स्पर्धेच्या आयोजनामागे होता. या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी एनएसएसएचने आयोजकांना सहाय्य केले. प्रचंड यशस्वी झालेल्या या स्पर्धेच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना मदत करण्यात आली. स्पर्धेसाठी किट व बक्षीसे यासाठी प्रायोजकत्व पुरवण्यासाठी त्यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे मोलाची मदत झाली आणि भविष्यातही अशा अनेक स्पर्धांसाठी असा सहयोग कायम राहील, अशी अपेक्षा आहे', असे नानावटी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे कर्मचारी व स्पर्धेचे एक आयोजक यशवंत साटम यांनी सांगितले.



विनायक धामणे यांनी प्रशिक्षण दिलेली, वांद्रे येथील महात्मा गांधी विद्यालयातील मुले व मुली विजेत्या ठरली. या स्पर्धेचे खास वैशिष्ट्य म्हणजे वरिष्ठ श्रेणीत सहभागी झालेल्या ३५ खेळाडूंना त्यांनी दाखवलेल्या कौशल्यासाठी विशेष बक्षीस मिळाले.